महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मुख्य कार्यालय : ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१.
क्षेत्रिय कार्यालय : सीईटी सेल, शासकीय दंत महाविद्यालयासमोर, सेंट जॉज रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
: सीईटी सेल, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.
ईमेलः maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईटः www.mahacet.org

क्र.राज्य सीईटी कक्ष/AIA PGET - 2017/नोटीस क्र.२७/१२१४ दिनांकः २५.११.२०१७.

# AIA PGET - 2017
# NOTICE
# ( Only for Candidates Registered on Directorate of AYUSH, Mumbai website )

**शासकीय, शासनअनुदानीत व खाजगी विनाअनुदानित आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम रिक्त जागांवरील प्रवेशाकरिता "महाविद्यालय स्तरावरील (Institutional level)" प्रवेश प्रक्रीया**(Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions Rule, २०१६ मधील Rule No.१४)

आयुष मंत्रालय, केंद्रसरकार, नवीदिल्ली यांचेकडील संदर्भ क्रमांक संख्या/ F.No.R.11011/04/2016-EP(IM-1), दिनांक २४/११/२०१७ अन्वये उपरोक्त अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा अंतिम दिनांक२९/११/२०१७ पर्यंत वाढविलेला आहे. सदरहु पत्राचे अटीप्रमाणे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकच्या मान्यतेच्या अधीन राहून सदरप्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर प्रवेशप्रक्रीया खाली दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार घेण्यात येत आहे-

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १) | *रिक्त जागांचा तपशील वेबसाईटवर (www.mahayush.gov.in) वर टाकण्यात येईल. | दि.२५.११.२०१७ |
| २) | उमेदवारांनी रिक्त जागांचा तपशील क्रमांक ०१ प्रमाणे पाहून त्यांच्या निवडीप्रमाणे व्यक्तीशः किंवा त्यांचे पालकांनी को-या कागदावर अथवा संबंधित महाविद्यालयाच्या वेबसाईटवर अर्ज सर्व आवश्यक प्रमाणपत्रासह संबंधित महाविद्यालयाकडे सादर करावा. | दि.२७.११.२०१७ तेदि.२८.११.२०१७ रोजी संध्याकाळी ५.००. वाजेपर्यंत |
| ३) | महाविद्यालयाने प्राप्त अर्जातून ( ऑनलाईन व ऑफलाईन अर्जातून ) गुणवत्ता यादी नोटीसबोर्डावर व महाविद्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याची वेळ | दि.२८.११.२०१७ रोजी रात्री०९.०० वाजेपर्यंत |
| ४) | महाविद्यालयाने गुणवत्तेनुसार उमेदवार प्रवेश देण्याची प्रक्रिया (जे उमेदवार AIA PGET- 2017 या ब्रोशर मध्ये नमूद सर्व मुळप्रमाणपत्र जमा करतील फक्त त्यांनाच महाविद्यालयीन स्तरावर प्रवेश घेता येईल) | दि.२९.११.२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. ते मेरिटप्रमाणे प्रवेशसंपेपर्यंत |
| ५) | महाविद्यालयाने प्रवेशित झालेल्या उमेदवारांचा तपशील, आयुष संचालनालयात ई-मेलद्वारे directorayurvedmaha@gmail.com सादर करणे. | दि.२९.११.२०१७ रोजी संध्याकाळी ०५.३० वाजेपर्यंत |

उमेदवारांनी महाविद्यालयात प्रवेश घेण्याकरिता आवश्यक मुळप्रमाणपत्रे **AIA PGET - 2017** माहिती पुस्तिका (**Brochure**) मध्ये नमूद केल्यानुसार व महाविदयालय सोडल्याचा दाखला सादर करणे अनिवार्य आहे.

## उमेदवारांसाठी अतिमहत्वाच्या सूचना

१) ज्या उमेदवारांनी **AIA PGET - 2017** ही परीक्षा दिलेली आहे व www.mahayush.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली आहे असे उमेदवार या महाविद्यालय स्तरावरील प्रवेश फेरीच्या प्रक्रीयेसाठी अर्ज सादर करु शकतील.

*२) दिनांक २५.११.२०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या महाविद्यालय निहाय उपलब्ध असणाऱ्या रिक्त जागा तसेच त्यानंतरही (ज्या महाविद्यालया मध्ये ज्या विषयात अर्ज मागविण्यात आले आहेत त्याच महाविद्यालयामध्ये त्याच विषयात) नव्याने त्याच विषयात रिक्त झालेल्या जागा याच फेरीमध्ये महाविद्यालयांना प्राप्त झालेल्या अर्जामधुनच भरण्यांत येतील.

३) ज्या उमेदवारांना यापूर्वीच्या प्रवेशफेरी मध्ये आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळाला असेल व उमेदवार संबंधित महाविद्यालयात दि.२५.११.२०१७ रोजी रुजू असतील असेउमेदवार या प्रवेश फेरीस अपात्र असतील म्हणजेच अशा उमेदवारांना सदर महाविद्यालय स्तरावरील प्रवेश फेरीसाठी अर्जकरता येणार नाही.

४) यापूर्वी वैयक्तिक समुपदेशन किंवा ऑनलाईन प्रवेशफेरी मध्ये राज्य सीईटी कक्षा मार्फत इंटरसे राऊंड पूर्ण झालेला असल्यामुळे महाविद्यालयात कोणतीही नवीन जागा उपलब्ध न झाल्यामुळे सर्व जागा खुल्या (Open) प्रवर्गातून उपलब्ध राहातील व संबंधित महाविद्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाच्या गुणानुक्रमानुसा रभरल्या जातील.

५) ज्या उमेदवारांनी ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे तेथे दि.२९.११.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. प्रवेश माहिती पुस्तिकेत नमूद केलेली सर्व मुळ प्रमाणपत्रे व महाविद्यालय सोडल्याचा दाखला यासह संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहाणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी (दुपारी ०२.०० वाजता उपस्थित विद्यार्थ्यांमधून गुणवत्तेप्रमाणे प्रवेश दिले जातील याची नोंद घ्यावी).

६) या प्रवेशफेरीत निवड झालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयाचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क धनाकर्ष / धनादेश किंवा रोखीने त्वरित अदा करुन आपला प्रवेश कायम करावा.

७) उमेदवारांनी आपल्या संबंधित महाविद्यालयातील गुणवत्ता यादीतील क्रमांक व महाविद्यालया मध्ये उपलब्ध जागा यांचा तपशील बघूनच संबंधित महाविद्यालयात प्रवेशा करीताउपस्थित रहावे.

८) उमेदवारांना कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी maharashtra.cetcell@gmail.com या ई-मेलवर किंवा ०२२-२२६५२२५९ या क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा.

९) महाविद्यालयाने/संस्थेने उमेदवाराकडे देणगी अथवा अतिरिक्त फीची मागणी केल्यास, उमेदवाराने नजिकच्या पोलीसस्टेशनमध्ये FIR नोंदवून त्याची प्रत प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई या कार्यालयास सादर करण्यात यावी.

१०)मा.आयुक्त व सक्षम प्राधिकारी राज्य सीईटीसेल, यांनी निरिक्षकांची नेमणूक केली आहे. उमेदवाराची प्रवेशाबाबत काही तक्रार असल्यास ती निरीक्षकांना द्यावी. त्यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील.

सही /-
(राजीव निवतकर) भा.प्र.से.
सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त, राज्य सीईटी कक्ष,
महाराष्ट्र राज्य